महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर -४३१००५
(महाराष्ट्र)"In Pursuit of Technical Excellence" ☎- office:(0240)2366101,2366102,
Principal : 0240-2366111 Fax:(0240)2332835e-mail –
office.gcoeaurangabad@dtemaharashtra.gov.in web : www.geca.ac.in

दिनांक: २७/०६/२०२४

## अठराव्या अर्थ समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत

दिनांक. २७/०६/२०२४ रोजी अठराव्या अर्थ समितीची बैठक BOG कक्षा मध्ये दुपारी ०३.३० वा. आयोजित करण्यात आली होती.सदर बैठकीत समितीसमोर सन २०२४-२५ या वर्षांचे वाढीव (पूरवणी) अंदाजपत्रक सादर करण्यात आले. सदर बैठकीस समितीचे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | बैठकिस उपस्थित अध्यक्ष व सदस्य यांचे नाव व पदनाम | |
|---|---|---|
| १ | **Dr. S.S.Dambhare** | **Chairman of Finance Committee** |
| २ | **Shri. Prasad Kokil** | **BoM Representative- Member** |
| ३ | **Dr. Sunanda Ghanegaokar** | **Associate Professor, Electrical Dept. Member** |
| ४ | **Dr. D.G. Regulwar** | **Registrar (Academic)- Invited Member** |
| ५ | **Shri. R.I.Kothari** | **Charted Accountant Member** |
| ६ | **Shri. Deepak Tarle** | **Registrar - Member Secretray** |
| | अनुउपस्थितीतस अनुमती दिलेले मा. सदस्य | |
| १ | **Finance And Accounts Officer, Dr. B.A.M. University Chh. Sambhajinagar** | **Member** |

प्रथम श्री डी.के.टर्ले यांनी सर्व मान्यवरांचे व अर्थ समितीच्या सदस्याचे स्वागत केले व नंतर अर्थ समितीचे अध्यक्ष प्राचार्य. डॉ. एस.एस.डंभारे यांनी अंजेडा बाबत सविस्तर स्पष्टीकरण दिले आणि समितीच्या परवानगीने बैठकीस सुरूवात करण्यात आली.

सर्व प्रथम बैठकीचा अजेंडा सन २०२४-२५ चा पुरवणी अर्थसंकल्प **Book of enclosure** सादर करण्यात आले.

१८.१ : दिनांक ०८.०४.२०२४ रोजी झालेल्या, सतराव्या अर्थ समितीच्या बैठीकीचे इतिवृत्तांत मंजूरीसाठी ठेवण्यात आले.

१८.२ : आर्थिक वर्षे २०२३-२४ या वर्षाकरीताचा लेखा परिक्षण अहवाला बाबत अर्थ समितीला अवगत करण्यात आला व मान्यता देण्यात आली.

१८.३ : आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षासाठी आवर्ती,अनावर्ती आणि इमारत देखभाल दुरूस्ती याकरीता रू.२७०२.७९ लक्ष अनुदान वाटपाच्या आदेशाबाबत अर्थ समितीला अवगत करण्यात आले. व सदर काम बांधकाम विभागामार्फत करण्याची प्रकिया सुरू आहे. तसेच काही लहान कामे NBA भेटीमूळे संस्थास्तरावर केली आहे.

१८.४ : आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षामध्ये दि.२१.०६.२०२४ रोजी पर्यंत संस्थेची आर्थिक स्थिती दर्शविणाऱ्या विवरणपत्राबाबत अर्थ समितीला अवगत करण्यात आले.

१८.५ : आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षामध्ये दि. ०१.०४.२०२४ ते दि.२१.०६.२०२४ रोजी पर्यंत संस्थेत जमा झालेली रक्कम दर्शविणाऱ्या विवरणपत्राबाबत अर्थ समितीला अवगत करण्यात आले.

- सन २०२४-२५ मध्ये या वर्षामध्ये दि. ०१.०४.२०२४ ते दि.२१.०६.२०२४ रोजी पर्यंत जमा झालेली रक्कम रु. ३४०.९२ लक्ष

१८.६ : आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षामध्ये दि. ०१.०४.२०२४ ते दि.२१.०६.२०२४ रोजी पर्यंत संस्थेत खर्च झालेली रक्कम दर्शविणाऱ्या विवरणपत्राबाबत अर्थ समितीला अवगत करण्यात आले.

- सन २०२४-२५ मध्ये या वर्षामध्ये दि. ०१.०४.२०२४ ते दि.२१.०६.२०२४ रोजी पर्यंत प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम रु.५३७.४८ लक्ष

१८.७: आर्थिक वर्ष २०२४-२५ करीता Academic Department करीता आवर्ती,अनावर्ती आणि इमारत देखभाल दुरूस्ती याकरीता रू. ४४२.५८ लक्ष रूपयांची पुरवणी मागणी Steatment-A नुसार रक्कम दर्शविण्यात आली.

१८.८: आर्थिक वर्ष २०२४-२५ करीता Academic Department करीता वाटप करावयाचे पुरवणी मागणीचे अनुदान आवर्ती, अनावर्ती आणि इमारत देखभाल दुरूस्ती याकरीता विभागवार आलेल्या अनुदान पुरवणी मागणीबाबत विभागवार स्वतंत्रपणे चर्चा करण्यात आली व सदर खर्च मागील सतराव्या अर्थ समितीच्या बैठकीत मंजूर अनुदानातून विभागाच्या प्राधान्यानुसार खर्च करण्यात यावा असे सूचविण्यात आले. सदरील संपूर्ण अनुदान खर्च झाल्या नंतर पुढील अर्थसंकल्पात पुरवणी मागणी सादर करण्यात यावी असे सुचविण्यात आले.

१८.९ :आर्थिक वर्ष २०२४-२५ करीता Non Academic Department करीता अनुदान आवर्ती,अनावर्ती अनुदान मागणी रू.१०.०० लक्ष पुरवणी मागणी Steatment-B नुसार रक्कम दर्शविण्यात आली.

१८.१०: आर्थिक वर्ष २०२४-२५ करीता Non Academic Department करीता वाटप करावयाचे अनुदान आवर्ती, अनावर्ती विभागवार आलेल्या अनुदान पुरवणी मागणीबाबत विभागवार स्वतंत्रणे चर्चा करण्यात आली व सदर खर्च मागील सतराव्या अर्थ समितीच्या बैठकीत मंजूर अनुदानातून खर्च करण्यात यावा असे सूचविण्यात आले. सदरील संपूर्ण अनुदान खर्च झाल्या नंतर पुढील अर्थसंकल्पात पुरवणी मागणी सादर करण्यात यावी असे सुचविण्यात आले.

१८.११ : निरंक

१८.१२: आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये संस्थेत Reasearch and Consultancy Cell (RACC) सुरू करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली व मागणी करण्यात आलेले रू. ०९.२० लक्ष अनुदान मंजूर करण्यात आले.

## ऐनवेळी येणारे विषय

१. संस्थेसाठी जी काही देणागी पदरेशस्थ माजी विद्यार्थी किंवा इतर कोणाकडून येत असल्यास ती फक्त INR या चलनातच घ्यावी अशी सूचना करण्यात आली. सदर रक्कम मा.प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर यांच्या खात्यात वर्ग करून जमा करण्यात यावी व संबधित विभागाने तेवढ्या रक्कमेचा अग्रीम घेऊन शासकीय विहीत पध्दतीने त्याच्या विनियोग करून Utilization Certificate जमा करावे अशा सूचना देण्यात आल्या.

२. संस्थेतील काही विभागांना देणगी देण्यास इंडस्ट्री तयार असल्याची माहिती समितीस देण्यात आली. त्याकरीता ची आवश्यकता असल्याने संस्थेत ट्रस्ट स्थापन करण्यात यावी अशी सूचना करण्यात आली. किंवा पूर्वी ट्रस्ट स्थापन केलेल्या असल्यास त्यांचे नुतनीकरण करण्यात यावे अशा सूचना देण्यात आल्या.

३. काही विभागांना इंडस्ट्रीने यंत्र सामगी देणगीदाखल दिलेली असल्याचे समितीला अवगत करण्यात आले अशा साहित्याची वेगळी नोंदवही करण्यात यावी व त्यांचे मुल्यांकन करण्यात यावे व ही माहिती अर्थ समिती व BOG ला देण्यात यावी अशा सूचना देण्यात आल्या.

४. पुढील काही वर्षांमध्ये Visiting/Adjunct Faculty ची संख्या वाढ होण्याची शक्यता गृहीत धरून संभाव्य दायित्व (Potential Liability) तयार करण्यात यावी. त्याकरीता सर्व वेतन अनुदान Balance Sheet मध्ये जमा मध्ये दाखवण्यात यावे. यानुसार जी तूट दिसत असेल त्यानुसार फी वाढीची शासनाकडे शिफारस करण्यात यावी.

५. संस्थेचे SBI मध्ये खाते आहेत तेथे व्याजदर वाढवण्या संबधी विनंती अर्ज सादर करावा अशा सूचना देण्यात आल्या.

६. रोखा विभागास Online Payments करण्यासाठी Internet Banking साठीची सुविधा घेऊन रु. १ लक्ष पर्यंतच्या मर्यादितं पेमेंट करण्यासा सूचित करण्यात आले व त्यासाठी वेगळे बँक खाते करण्याच्या सूचित करण्यात आले.

७. परीक्षा विभाग व वसतीगृह विभाग यांचे बँक खाते दोन सहीने (प्राचार्य व संबधीत विभागप्रमुख) यांच्या हाताळले जातील अशा सूचना देण्यात आल्या.

८. संस्थे मधील सर्व बॅक खाते पुढील अर्थ समितीच्या बैठकीत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

९. ॲसेट रेजिस्ट्रर हे बॅलेंन्स सिट मध्ये डी.एस.आर. पडताळणीकरीता आणणे अशा सूचना देण्यात आल्या.

१०. निर्लेखन प्रकिया करूनच नविन उपकरणे घ्यावे अशा सूचना देण्यात आल्या.

११.आवश्यकते प्रमाणे काही उपकरणे खरेदी करावयाचे असल्यास चालू आर्थिक वर्षात वितरीत करण्यात आलेल्या अनुदानामधून खरेदी करण्यात यावे अशा सूचना देण्यात आल्या.

१२.समिती कडून असे निर्देशित करण्यात आले की सर्व विभागांसाठी रू. ०५.०० लक्ष किमतीपेक्षा जास्त किमंत असलेली यंत्रसामगी विभागांनी Lab Adequacy Audit करून घेऊन ते BOS मधून मंजूर करून घ्यावे असे सूचविण्यात आले.

१३.या विभागांनी LCD Projector ची मागणी केलेली आहे. त्या सर्वांना सूचित करण्यात आले की, त्या ऐवजी Digital Smart Board घेण्यात यावा असे सूचविण्यात आले. सर्व विभागांसाठी साठी सादर केलेल्या यादीत बदल करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

१४.यंत्र अभियांत्रिकी विभागाच्या यादीतील बस व चारचाकी वाहनाच्या खरेदीचा प्रस्ताव BOG पुढे मंजुरीसाठी संस्थास्थरावर खरेदी करीता ठेवण्यात यावा असे सांगण्यात आले.

१५.परीक्षा नियंत्रकांनी सादर केलेली यंत्र सामग्री मागिल अर्थ समितीच्या मंजूर केलेल्या अनुदानातून करण्यात यावी असे सांगण्यात आले.

१६.MIS Software च्या Maintenance/ Extension करीता वेगळी मिटींग BOG बरोबर घेण्यात यावी अशा सूचना देण्यात आल्या व तशी तरतूद करण्यात यावी.

१७. पदवी वितरण समारंभासाठी रू. १०.०० लक्ष मंजुरी देण्यात आली.

१८. Reasearch and Consultancy Cell (RACC) सुरू करून त्याकरीता संस्थेमध्ये जागा शोधण्याची सूचना देण्यात आली.

१९.संस्था NACC ची मान्यता प्राप्त करण्यीता अर्ज दाखल करीत आहे. त्या फी करीता रू.३००००/- व आवश्यकता पडल्यास नविन NACC Scheme मध्ये अर्ज दाखल करण्यास रू.३००००/- अशा फी च्या रकमेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. तसेच NACC करीता विद्यापीठाची फीस भरण्याची शिफारस करण्यात आली.

२०.संस्थेचे सुशोभिकरण व संस्था पर्यावरणास अनुकूल बनवणे याकरीता तपशीलवार Presentation तयार करून ते इंडस्ट्री व माजी विद्यार्थी संघ यांच्या समोर सादर करून निधी मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत अशी शिफासर करण्यात आली. याकरीता रू. ३०.०० लक्ष ची मंजुरी देण्यात आली.

२१.सध्या चालू असलेला Solar roof top Plant ला सुस्थितीत आणावे व नविन असेच पकल्प मान्यतेकरीत सादर करावेत असे सांगण्यात आले.

२२.रू.२००००/- ( तात्पुरत्या लहान खर्चा करीताचा निधी) हा HOD, Deans and Other Important Portfolio Incharge यांना देण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

२३.BWC ला मंजूर केलेल्या अनुदानातून कामे पूर्ण करून त्यासंबंधीतचे उपयोजन प्रमाणपत्र (Utilization Certificate) तयार करून सादर करावे अशा सूचना देण्यात आल्या.

२४. संस्थेत रोख व्यवहाराचे प्रमाण कमी करून Digital Transaction द्वारे व्यवहार जास्तीत जास्त प्रमाणात करावे अशी सूचना देण्यात आली.

२५.दि. १५ जुन २०२४ रोजी झालेल्या NBA समितीच्या भेटी करीता संस्थेचे रंगरंगोटी व सुशोभिकरणाचे काही कामे संस्थेच्या विभागाच्या स्तरावर पूर्ण करण्यात आले.

२६.प्राचर्यांनी मांडलेल्या संस्थेत केंद्रीय पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या कल्पनेवर समितीने चर्चा केली व त्या करीता रू. १०.०० लक्ष मंजूर करण्याची शिफासर करण्यात आली.

२७.मागील वर्षापेक्षा यावर्षी प्रथम सत्रामध्ये चांगल्या प्रकारे कामे/खर्च झाले आहेत व Facelifting कामे सुरू आहेत.असे अर्थ समितीस अवगत करण्यात आले.

२८.मागिल वर्षातील सर्व Advances पूर्ण झाले आहेत आणि Online Transaction वाढवले आहेत याबाबत अर्थ समितीस अवगत करण्यात आले.

२९.NBA चे काही महत्त्वाचे कामे विभागियस्तरावर Visiting Facu lty ने केलेली आहेत. त्यांचे अतिरीक्त मानधन प्रात्यक्षिकांच्या मानधनाप्रमाणे देय आहे.

३०.संस्थेतील खाते क्रमांक ७०३ या खात्यामध्ये जमा असलेली मॉड बॅलन्सची रक्कम नियमीत खात्यात वर्ग करण्यात यावी.

शेवटी सर्वाचे आभार व्यक्त करून बैठक संपल्याचे अध्यक्षांनी सांगीतले.

श्री.डी.के.टर्ले
सदस्य सचिव, अर्थ समिती

डॉ.एस.एस.डंभारे
अध्यक्ष,अर्थ समिती

प्रत : १) सर्व सन्माननीय सदस्य अर्थ समिती यांना सविनय माहिती व मान्यतेस्तव सादर
२) सर्व विभाग प्रमुख व अधिष्ठाता यांना माहिती व कार्यवाहीस्तव
३) संस्थेच्या संकेतस्थळावर आपलोड करण्यासाठी